I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 246-250
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मराठी कवितेला समृद्ध करणारी पवारांची विज्ञान कविता

**विजया जितेंद्र राऊत**
विमेंस कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स

| Communicated : 31.01.2023 | Revision : 07.03.2023<br>Accepted : 05.04.2023 | Published : 30.05.2023 |
|---|---|---|

**सारांश :**
नव्वदोत्तरी मराठी कवितेत निसर्ग व विज्ञान कवितांचा प्रवाह बळकट करणारे कविवर्य प्रा.आ.य. पवार हे एक प्रतिभासंपन्न कवी आहेत. त्यांनीकाहीग्रामीणकथांचेलेखनकेलेअसलेतरी, कथेपेक्षाकवितेतत्यांनाविशेषरुचीआहे.विविध काव्यसंग्रहातून प्रसिद्ध झालेली आ.य. पवारांची ग्रामीण कविता बहूआयामी आहे.परंतु प्रस्तुतच्या माझ्या शोधनिबंधाचा विषय आ.य. पवारांची विज्ञान कविता हा आहे . गेल्या दहा-पंधरा वर्षात त्यांनी पन्नासहून विज्ञान कविता लिहिल्या. ऊनपाऊस (२०१३) धूळपेर(२०१८) आणि डॉ. वंदना लव्हाळे यांनी संपादित केलेल्या 'द्विदल ' या संग्रहात प्रसिद्ध झालेल्या आहेत.विज्ञान साहित्य किंवा कविता भविष्यवेधी असणे हा चमत्कार नसून त्या साहित्य प्रकाराचे एक ठळक लक्षण आहे .कवी पवारांची विज्ञान कविता भूतकाळावर उभी राहून भविष्यावर दुर्बिण रोखते. गूढत्वाचा अचूक वेध घेते.असे असूनही तिच्या केंद्रस्थानी माणूसच असल्याचे दिसून येते.विध छंद -वृत्ते व प्रतिमा प्रतीकांनी नवनवीन आशयाचा माहोल कवेत घेऊन विज्ञान संकल्पनांचा झुला गगनगामी नेणारी पवारांची कविता स्वतंत्र वळणाची व प्रयोगशील आहे. त्यांच्या विज्ञान कवितेवर कोणत्याही काव्यप्रवाहाची छाप नाही.मराठीत दर्जेदार विज्ञान कविता दूर्मिळ आहेत. अशा मंदीच्या काळात पवारांच्या कवितेने विज्ञान कवितेला बळकटी देऊन विज्ञान कवितेच्या शुष्क प्रदेशात चैतन्य निर्माण केले आहे.

**मुख्यशब्द** : विज्ञान कविताचैतन्यबहूआयामीगूढत्वाचा

## प्रस्तावना :

नव्वदोत्तरी मराठी कवितेत निसर्ग व विज्ञान कवितांचा प्रवाह बळकट करणारे कविवर्य प्रा.आ.य. पवार हे एक प्रतिभासंपन्न कवी आहेत. त्यांनी काही ग्रामीण कथांचे लेखन केले असले तरी, कथेपेक्षा कवितेत त्यांना विशेष रुची आहे. शैक्षणिक सामाजिक कार्याबरोबरच नगर जिल्ह्यातील जामखेड व सीनाखोऱ्यात त्यांनी ग्रामीण साहित्य चळवळीसाठी झपाटलेपणाने १९९० पासून कार्य केलेले आहे. 'सीनाकाठच्या कविता '(१९९०)'ऊनपाऊस'(२०१३)' धूळपेर '(२०१८) 'द्विदल '(२०१८) आदी ५ काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या कविता वाङ्.मयीन गुणवत्तेने सरस व बहुआयामी असल्याने त्यांच्या 'ऊनपाऊस' आणि 'सीनाकाठच्या कविता' या काव्यसंग्रहावर दोन अभ्यासकांनी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातून एम.फिल.केलेले आहे. नगर ,बीड, सोलापूर जिल्ह्यातील वाहणाऱ्या सीनानदीवर उत्कृष्ट निसर्ग कविता लिहून मराठी साहित्यात पौराणिक, वाङ्.मयीन, प्रादेशिक, ऐतिहासिक व निसर्ग अशा विविधांगांनी सीनेचे कार्याचा गौरव केलेला आहे. पुणे, नगर आकाशवाणीवरून 'सीना' कविता गायिली गेलेली आहे. मुंबई दूरदर्शनने देखील कवी पवारांच्या निसर्ग कवितांवर परिसंवाद प्रक्षेपित केलेला आहे. तसेच रानगंध, इंद्रधनु, आ. य. पवारांच्या 'ऊनपाऊस' कवितेचे वाङ्.मयीन स्वरूप हे तीन समीक्षाग्रंथ त्यांच्या कवितेवर प्रसिद्ध झालेले आहेत. यावरून पवारांचे काव्यलेखन वाङ्.मयीन गुणवत्तेने सशक्त असल्याचे दिसून येते.

कविता हा एक उत्कट भावनानुभूती व्यक्त करणारा कल्पनारम्य वाङ्.मयप्रकार आहे. वेगवेगळ्या प्रतिमा, प्रतीके, मिथकाद्वारे कवी भावार्थ व्यक्त करतो. त्यातून रसिकास आनंद मिळतो, प्रसंगी नवे ज्ञानही मिळते . विविध काव्यसंग्रहातून प्रसिद्ध झालेली आ.य. पवारांची ग्रामीण कविता बहूआयामी आहे . परंतु प्रस्तुतच्या माझ्या शोधनिबंधाचा विषय आ.य. पवारांची विज्ञान कविता हा आहे . गेल्या दहा-पंधरा वर्षात त्यांनी पन्नासहून विज्ञान कविता लिहिल्या. ऊनपाऊस (२०१३) धूळपेर(२०१८) आणि डॉ. वंदना लव्हाळे यांनी संपादित केलेल्या 'द्विदल ' या संग्रहात प्रसिद्ध झालेल्या आहेत.

याशिवाय विविध नियतकालिकातून त्यांच्या विज्ञान कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. १९६० नंतर मराठी साहित्य

प्रवाहात विज्ञान साहित्याने आपले स्थान बळकट केले असले तरी त्यात कथा, कादंबरीच आहे. विज्ञान कविता नगण्य स्वरूपात दिसून येते. १९१६ ला मासिक 'मनोरंजन' मध्ये "परमाणुचे कार्य महात्म्य " ही गोविंदाग्रजांची पहिली विज्ञान कविता प्रसिद्ध झाली. त्यानंतरच्या शतकभरातही विज्ञान कविता दुर्मिळच राहिली. कवी कुसुमाग्रज , बा. सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर ,भालबा केळकर, शिरीष देशपांडे आदी मोजक्याच कवींनी विज्ञान कविता लेखन केले असले तरी ते अल्प प्रमाणात आहे. त्यामुळे आज एकविसाव्या शतकाच्या उदयकाळात विज्ञान कविता बाल्यावस्थेतच आहे; असे विज्ञान कवितेच्या अभ्यासक डॉ. वंदना लव्हाळे (द्विदल पृष्ठ २६ प्रस्तावना ) म्हणतात, ते यथार्त वाटते . आजच्या विज्ञान युगात मराठी भाषेला विज्ञान साहित्याची नितांत गरज आहे. विज्ञान साहित्य विविधांगांनी उपयुक्त साहित्य आहे. यामुळे विज्ञान साक्षरता वाढते, अंधश्रद्धा नष्ट होऊन डोळस दृष्टी लाभते. समाजात मानवी मूल्यांची रुजवण होते. विज्ञान भविष्यकालीन संकटांची जाणीव देत असल्याने होणारी हानी टाळता येते. आदी उपयुक्ततेस्तव भाषेला विज्ञान साहित्याची निकड वाटते, परंतु कवितेत भावनेला, कल्पनेला महत्त्व असते, आणि विज्ञान कवितेत या दोन्हींना थारा नसल्याने मराठीत विज्ञान कविता दुर्मिळ अवस्थेत राहिल्याचे अनेक समीक्षकांचे मत आहे. तथापि या विचारास आ. य. पवारांच्या विज्ञान कवितेने छेद दिल्याचे दिसून येते. 'ऊनपाऊस' (२०१३) 'धूळपेर'(२०१८) काव्यसंग्रहातील त्यांच्या विज्ञान कवितांनी मराठी काव्य प्रवाह बळकट केल्याचे दिसून येते. त्यांची 'विज्ञानयुग' ही एक कविता वाचली तरी अस्सल विज्ञान कवितेची आशयगर्भता आपल्या लक्षात येते. वैज्ञानिक घटितांच्या अर्थाला विज्ञान संकल्पनेतून बैठक देण्याचे कार्य कवी पवारांची विज्ञान कविता करते. म्हणून ती निखळ विज्ञान कविता वाटते. काही कवी आपल्या कवितेत शास्त्रज्ञांचा किंवा विज्ञान संज्ञेचा उल्लेख करतात, आणि तुटपुंज्या उल्लेखांना विज्ञान कविता म्हणतात. अशा कवितेला फार तर विज्ञानस्पर्शी कविता म्हणता येईल; परंतु निखळ विज्ञान कविता म्हणता येणार नाही. आ. य. पवारांची विज्ञान कविता सरस विज्ञान कविता वाटते विज्ञान संकल्पनेतून त्यांच्या कवितेचा भावार्थ विस्तारतो. विज्ञानाच्याच भावार्थाची, विचारांची डूब कवितेत दिसते. शिवाय त्यांच्या कवितेला अंतर्गत लय असते, नादमयता असते आणि नादमयता वाचकास आपलेसे करते, आनंद मिळवून देते. कवितेने आनंद मिळवून देणे हा साहित्य कलेचा, काव्याचा उद्देश आहे, असे वड्स्वर्थने लिरिकल बॅलड्सच्या प्रस्तावनेत म्हटलेले आहे. म्हणजेच वाचकाला उत्सुकता व आनंद मिळवून देणे हे साहित्याचे प्रयोजन आहे. यासंदर्भात कवी पवारांच्या विज्ञानयुग, जल, तोल, अनोखी, खरेदी, विश्वाचे नवल, उल्का, रूपांतर, उत्क्रांती, विज्ञानवंदना, बर्म्युडा ट्रँगल अशा कितीतरी विज्ञान कवितांचा उल्लेख करता येईल. 'विज्ञानयुग ' व 'बर्म्युडा ट्रँगल ', 'पाणीदार चंद्र' या कविता मुक्तछंदात असून देखील प्रवाही लय आणि औत्सुक्याच्या नाविन्याने वाचक कवितेशी एकरूप होतो. "पाणीदार चंद्र" या कवितेत

पृथ्वीचे तापमान
सालनसाल वाढत आहे
विज्ञानाच्या वारू वरचा
माणूस मनात कुडत आहे

असा औत्सुक्यभाव दिसून येतो, कवितेतच तरवळतो. त्यामुळे कविता वाचाविशी वाटते.

किंवा

वेगवान तारा म्हणे.
पृथ्वीला धडक देईल
क्षणार्धात कृष्णविवर
दुनियेला ओढवून घेईल (विज्ञानयुग)

अशी नादमय गतिशीलता व आशय संपन्नता असल्याने रुक्ष वाटणारे विज्ञान समजण्यास सुलभ वाटते. इंग्रजी भाषेतून विज्ञान साहित्य कथा, कादंबरी, कवितेचे वस्त्रप्रावरण लेऊन मराठीत आले आणि हेच विज्ञान किंवा विज्ञानाच्या संकल्पना, विज्ञानामुळे झालेले बदल, कवी आ.य. पवारांनी विज्ञान कवितेतून सोपे करून दिले. म्हणून तर पवारांच्या निसर्ग व विज्ञान कवितांचा डॉ. वंदना लव्हाळे यांनी संपादित केलेल्या 'द्विदल' ग्रंथाचे दैनिक लोकमत मधील ग्रंथ परीक्षणात समीक्षक डॉ. मधुकर क्षिरसागर लिहितात की, "विज्ञानातील नवनव्या प्रतिमा व नवनवी भाषिक रूपे

प्रतीके व संकल्पना यातून पवारांची कविता सहज फुलून येते.

विज्ञान कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण शब्दरचना व त्यातील नादमयता मोहक वाटते. वैज्ञानिक प्रतिमासृष्टी, लोकतत्त्वे याचाही ते प्रभावीपणे उपयोग करतात.

वाचकांना प्रेरणा देणारी व बुद्धीला आव्हान देणारी पवारांची निसर्ग व विज्ञान कविता निश्चितच कालत्रयी ठरेल असे वाटते. (दै. लोकमत, रविवार पुरवणी ३-११-२०१९ पृष्ठ ४) पवारांच्या विज्ञान कविता छंदोबद्ध आहेत. विविध अक्षर छंदातून ,मात्रावृत्तातून, कविता असल्याने लयबद्धता अंगभूत निर्माण झाली आहे. काही कविता मुक्त छंदातून असल्यातरी कवितेला भावलय व नादमयता आहे. त्यामुळे वाचक कवितेशी एकरूप होतो.

आज साहित्यातून म

डळमळीत झाली आहे. पैशाभोवती फिरणारी दुनिया व जगात वाढत चाललेल्या दहशतवादामुळे आज सामान्य माणूस उदास, खिन्न झाला आहे. त्यातच प्रगत विज्ञानाचा उपयोग माणूस विधायक कार्याऐवजी विघातक कामासाठी करीत असल्याने कवी चिंतित होतो. 'चिंता' कवितेत कवी म्हणतो.

विज्ञानाची रेल्वे धावते
संस्कृतीची वेल थरकते
खेडूत म्हणतो, येताळाचे
असेच जुळते हडळी नाते

विज्ञानाने साधलेल्या प्रगतीतून नीतीतत्वांचे व संस्कृतीचे रक्षण होऊन माणूसपणाचे रक्षण होऊन समाज मनाचा विकास झाला तर प्रगती म्हणता येईल; परंतु भौतिक समृद्धी बरोबर माणसांची मानसिक विकृती वाढत गेल्यास समाजजीवनाला एकप्रकारची सूज येईल. अशा प्रगतीला खेडूत येताळाचे हडळी नाते जुळतो असे म्हणतो.

बा. सी. मर्ढेकर यांनी मराठी कवितेला अनुभूतीची नवी क्षितिजे खुली करून दिली आणि कवितेला आशय घनतेची व सौंदर्यपूर्णतेची नवी लेणी बहाल केली. कवी कोणत्याही विषयावर कविता लिहू शकतो. पण रसात्मक व स्फुरित असावी, केवळ तर्क किंवा विचारांच्या सयमक ओवी जुळवून कविता होत नाही . कवितेऐवजी ती (गद्यात्मक) कारागिरी होईल. कविता उत्स्फूर्त असावी लागते . पाश्चात्य कवी वर्डस्वर्थ म्हणतात- Poetry is spontaneous over flow feelings and killing. उस्फुर्त इच्छा भावनांचा तरल आविष्कार म्हणजे काव्य. आ. य .पवारांची कविता याला अपवाद नाही. प्रतिभा व कल्पकतेच्या सामर्थ्यावर त्यांनी विज्ञान कविता लिहिल्या आहेत. नावीन्यपूर्ण विषयातून व अर्थ [illegible] त्यांची कविता [illegible] उंचीवर जाते. समुद्राचे पाणी खारट असते; पण सागर तीरावरील नारळाचे पाणी अमृतासम गोड असते .चंद्र सूर्यामुळे होणाऱ्या भरती ओहोटीचे तिथे विज्ञान असल्याचे 'जळ' (धूळपेर) या कवितेत कवी म्हणतो.

शशि-रवीची पुण्याई
दर्या किनारी देठाला
भरलेल्या सागराची
नाही ओंजळ ओठाला

त्याचप्रमाणे पृथ्वीच्या कललेल्या आसामुळे अवकाशातून येणारी अशनीची (उल्का, लघुग्रह) अनेक संकटे टळली जातात. शिवाय कललेल्या आसामुळे पृथ्वीवर विविध ऋतू निर्माण होऊन सजीव सृष्टीला या ऋतूंचा फायदा होतो, हे वैज्ञानिक सत्य कवीने 'तोल' (धूळपेर) या कवितेत विशद केले आहे.

महि सांभाळी निजबाळांना
राहू-केतूंना करिते गोल
पहा मानवा तुझ्या भल्यास्तव
आस कलवुनी राखी तोल

अशा भावार्थातून पृथ्वी मातेविषयी कवी वाचकांच्या मनात आदर निर्माण करतो. तसेच पृथ्वीवर पाणी आले कोठून याचे उत्तर कवी विज्ञान संकल्पनेतून 'उल्का'(व्दिदल) कवितेत मांडतो.

ब्रम्हांडातुनि पडली उल्का
तिच्या कटीची फुटली घागर
त्या जलरेषांतुनी महीवर
जिकडे तिकडे भरले सागर

ही कविता स्फुरित असून देखील विज्ञान संकल्पनेत फुलून आली आहे. प्रतिभा व कल्पकतेच्या सामर्थ्यावर विज्ञानाच्या विविधांगी विचारांच्या पाकळ्यातून त्यांची कविता लीलया फुलून येते . म्हणून मला असे म्हणावे वाटते की, कवी आ.य .पवारांची विज्ञान कविता म्हणजे नव्वदोत्तरी मराठी कवितेच्या विज्ञान उद्यानात (बॉटनिकल गार्डन ) बहरलेला गंधित फुलांचा ताटवा होय. आमच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या द्वितीय वर्ष बी. कॉम. मराठी पाठ्यपुस्तकात आ.य .पवारांची 'विश्वाचे नवल' ही विज्ञान कविता अभ्यासक्रमास आहे. सूर्य मंडळातील विविध

ग्रह अब्जावधी वर्षापासून एका प्रतलात फिरत असून शेजारच्या किंवा दुसऱ्याच्या कक्षेत मुळीच डोकावत नाही. ते गतिशील असून शिस्तप्रिय आहे. माणूस मात्र आळशी बनून शिस्त मोडू लागला आहे. रानात शेजाऱ्याचा बांध कोरण्यापासून ते शेजारच्या किंवा दारातील रस्त्यावर थोडेफार का होईना पण अतिक्रमण करण्यात तो धन्यता मानू लागला आहे. जलप्रदेश, भूप्रदेश ,अतिक्रमणातून सध्या देशा-देशात वाद निर्माण होत आहेत. या सर्वांनी ग्रह-ताऱ्यांकडून बोध घ्यावा असे कवी नकळत सुचवतो. बिग बँग सिद्धांतातून जन्मलेले विश्व एखाद्या फुग्याप्रमाणे सतत विस्तारत चालले आहे. विश्वाच्या या अद्भुत विस्ताराचे कवीला नवल वाटते. शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग म्हणतात. विश्वातील दीर्घिका आपल्यापासून दूर दूर विस्तारत जातांना (दुर्बिणीतून) आपणास दिसतात. आणि आपण विश्वाच्या मध्यवर्ती असल्याचा भास होतो; पृथ्वीवरून कोठूनही पहा सारखेच दिसेल; अब्जावधी वर्षापासून गतिमान व शिस्तप्रिय असलेल्या या विश्वाचा नियंत्रक कोण असावा असा गूढ प्रश्न कवीला पडतो. मानवी देह दिसतो. पण देहाला नियंत्रित करणारा आत्मा किंवा मन प्रत्यक्ष कुणालाच दिसत नाही; तद्वत विश्वाला गतिशील ठेवून त्याचा विस्तार करणारी विज्ञानाची गूढ शक्ती असावी असे कवीला वाटते. जन्म आणि मृत्यू किंवा विकास आणि विनाश हे कोणालाच टळले नाही. दैनंदिन विस्तार पावणाऱ्या विश्वाची जेव्हा उलट क्रिया घडेल, म्हणजे विश्व अकुंचन पावेल तेव्हा विश्वातील सजीवसृष्टी, ग्रह-तारे सर्वच नष्ट होतील. हे विश्व मूळ बिंदूवत होईल. (डार्क एनर्जीत त्याचे रुपांतर होईल) आणि काही कालखंडानंतर बिंदूवत विश्वाचा पुन्हा Big Bank सिद्धांताप्रमाणे महाविस्फोट होऊन विश्व पुन्हा प्रसरण पावू लागेल. अशा या गूढ विश्वाचे नवल कवी आ. य. पवार वैज्ञानिक संकल्पनेतून - नावीन्यपूर्ण प्रतिमांतून मांडतात.कवीने वापरलेले पादाकुलक वृत्त कवितेच्या भावार्थाला साजेसे असून काव्याशयाला विस्तारीत करते. ही निखळ विज्ञान कविता असून मानवी चेहराही कवितेत दिसून येतो. हे पवारांच्या प्रयोगशील कवितेचे वैशिष्ट्य होय.

१३ जून २०२२ च्या दैनिक लोकमत मध्ये कोरोना उगमा संदर्भात एक बातमी प्रसिद्ध झाली आहे.जागतिक आरोग्य संघटनेने म्हणजे 'हू'(WHO) ने नियुक्त केलेल्या जगातील २६ शास्त्रज्ञांच्या (सॅगो) समितीने कोरोना विषाणूचा प्रसार वटवाघूळापासून व वुहान चीन शहरातून झाल्याचे म्हटले आहे. कोरोनावर कवी पवारांनी सात कविता लिहिल्या.कोरोनाची लाट उसळून भय निर्माण झाले तेव्हा सप्टेंबर २०२० मध्ये 'गूढ कोरोना' ही पादाकुलक वृत्तातील कविता लिहून २०२०च्या 'सीनातीर' दिवाळी अंकात ती प्रसिद्ध झाली. कवितेत कोरोनाचे मूळ -कूळ स्वरूप मांडले आहे.

" दुडक्याचाली जगी नाचतो
निर्दय होउनि नवथर कोविड
"लपा घरांनि---घुमे कोरोना
यांच्या हाती उलटा आसूड"
"अगम्य भासे वटवाघुळि सुड
जसे तरुवर उल्टे पक्षी
टांगुनि खाती विष्टा स्वतःची
निबीड काननी पुराण वृक्षी "
कुण्या तरूचे मूळ कोणते?
कुण्या खगाचे कूळ कोणते?
मेळ बसेना विज्ञानाला
'हू ' ने सोडिले खूळ कोणते?

कोरोना विषाणू वटवाघुळी असल्याचा आणि चीन मधील 'हुवान' येथून -'हू' कडून आल्याचा कवितेत स्पष्ट उल्लेख दिसून येतो. विविध प्रकारच्या झाडांवर विविध जातींची वटवाघुळे असल्याने नेमका कोणत्या जातीच्या वटवाघुळाचा कोरोना विषाणू आहे हे कवीने "कुण्या खगाचे कूळ कोणते?" याचा मेळ शास्त्रज्ञांना बसत नसल्याने जलदपणे त्यावरील उपाय शोधण्यात संशोधकांना अडचणी आल्याचे कवितेत अल्पाक्षरात मांडले आहे. उलट्या आसूडाने बैलगाडीची चालली, बैले बिथरतात. तसा पहिल्या लाटे पेक्षा दुसऱ्या व तिसऱ्या लाटेत कोरोना जास्त पसरण्याचा जगाने अनुभविले आहे. जगाला भयभीत करणाऱ्या कोरोनाचा अखेर वैज्ञानिक लसीने बंदोबस्त केल्याने कोरोनावरील इतर कवितातून कवी विज्ञानाचे महत्त्व सांगतो, ऊनपाऊस मधील 'संदेश' कवितेतही भविष्यातील संकटाची नांदी अगोदर टिपली आहे. छोटी मुंगी वारुळा खालच्या घरात ऊन-वादळे सारख्या भावी संकटातून स्वतःचे व भावी पिढ्यांचे रक्षण करते .

माणसापेक्षा मुंग्यांची संख्या पृथ्वीवर जास्त असून देखील त्यांनी प्रदूषण केले नाही. विज्ञानाच्या आधारे आपण खूप प्रगती केली; परंतु आपल्या भविष्याचे रक्षण आपण केले नाही. प्रदूषण वाढवून व झाडे तोडून आपण दुष्काळ आणले .भावी- काळ आपण संकटग्रस्त केल्याने छोट्या मुंगीच्या शिस्तप्रिय वर्तनातून संदेश घेण्याचे कवी सुचवितो.

एखादी भाषा पुष्कळ विकसित असेल, तर समाजाचे बहुतेक पैलू त्यात उमटतात. परंतु काही महत्त्वाचे पैलू भाषेकडे उपेक्षिले गेले ,तर त्या बाबतीत तिला असमृद्ध समजले पाहिजे. या मानदंडाद्वारे आपण असे म्हणू शकतो की इंग्रजी भाषा मराठीपेक्षा अधिक समृद्ध आहे. मराठीचे अपूर्णत्व सर्वात जास्त विज्ञान साहित्याबाबत जाणवते. "अशी खंत डॉ.जयंत नारळीकर यांनी नाशिक येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषणात व्यक्त केली". कित्येक शोध लागण्यापूर्वी त्याचे साहित्यात पाठपुरावा केल्यानंतर ती वास्तवात उतरल्याची शेकडो उदाहरणे आहेत. आज अवघड कामे करणाऱा रोबो, रोबॅट चा प्रथम उल्लेख १९२० मधील लेखक कॅरेल कॅपेन झेक यांच्या 'आर. यू. आर' या गाजलेल्या इंग्रजी नाटकात आहे. या नाटकात 'रोबो ' हे काल्पनिक यांत्रिक पात्र आहे. त्यातूनच आजचा, 'रोबो 'जगात गाजत आहे. यावरून प्रतिभासंपन्न कवी- लेखक आपल्या 'स्फुरित' साहित्यातून भविष्याचा अचूक वेध घेतात, हे स्पष्ट होते. सेकंदाला १७ कि.मि. वेगाने 'नासाने' १९७७ साली विश्व पोकळीच्या शोधार्थ सोडलेले 'व्हायेंजर 'यान एलियन्सचा सप्तर्षी तारकासमूहात शोध घेईल असा कवीला विश्वास वाटतो. उद्याचा काळ कसा असेल हे सांगणे कठीण असले तरी प्रा. पवार प्रतिभा सामर्थ्याने भविष्यकालिन गोष्टींचा अचूक वेध घेतात . म्हणून नव्वदोत्तरी मराठी कवितेतील दूरदृष्टीचा कवी म्हणून विज्ञान साहित्याच्या समीक्षक डॉ. मोना चिमोटे त्यांचा उल्लेख करतात. 'विज्ञान वंदना', 'तोल', ' पाणीदार चंद्र' ,'विज्ञानयुग', 'संदेश', 'रहस्य', 'व्हायेंजर "गूढकोरोना', 'अपेक्षा' अशा त्यांच्या पुष्कळ कविता भविष्यवेधी असल्याचे दिसून येते. विज्ञान समजण्यास कठीण असते. लयबद्ध, छंदोबद्ध, कवितेतून ते मांडल्यास कविता गुणगुणल्यामुळे ते अधिक सोपे होते, परंतु विज्ञान सिद्धांत- सूत्रे कवितेतून मांडणे अवघड असते. प्रा. आ. य. पवार प्रतिभा सामर्थ्यावर, नावीन्यपूर्ण कल्पकतेतून वैज्ञानिक संकल्पना -संकेतातून भाषिक सौंदर्याचा विलोभनिय ढाळ देत कविता लक्षवेधक करतात.

**सारांश:**

विज्ञान साहित्य किंवा कविता भविष्यवेधी असणे हा चमत्कार नसून त्या साहित्य प्रकाराचे एक ठळक लक्षण आहे .कवी पवारांची विज्ञान कविता भूतकाळावर उभी राहून भविष्यावर दुर्बिण रोखते. गूढत्वाचा अचूक वेध घेते. असे असूनही तिच्या केंद्रस्थानी माणूसच असल्याचे दिसून येते.

विविध छंद -वृत्ते व प्रतिमा प्रतीकांनी नवनवीन आशयाचा माहोल कवेत घेऊन विज्ञान संकल्पनांचा झुला गगनगामी नेणारी पवारांची कविता स्वतंत्र वळणाची व प्रयोगशील आहे. त्यांच्या विज्ञान कवितेवर कोणत्याही काव्यप्रवाहाची छाप नाही. मराठीत दर्जेदार विज्ञान कविता दूर्मिळ आहेत. अशा मंदीच्या काळात पवारांच्या कवितेने विज्ञान कवितेला बळकटी देऊन विज्ञान कवितेच्या शुष्क प्रदेशात चैतन्य निर्माण केले आहे.

**संदर्भ :**

मराठी विज्ञान परिषद पत्रिका ( मुंबई) नोव्हें. २०२० दिवाळी अंक.

धूळपेर -(काव्य) आ.य .पवार, रानजाई प्रकाशन ,पुणे

द्विदल -(काव्य) आ.य. पवारांची निसर्ग व विज्ञान कविता संपादक-- डॉ. वंदना लव्हाळे ,यशोदीप पब्लिकेशन्स पुणे

डॉ. मधुकर क्षिरसागर: द्विदल (समीक्षा) दै. लोकमत ३:११:२०१९

डॉ. जयंत नारळीकर : दै. सकाळ ३ व ४ डिसें. २०२०(९४ वे साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण)

मराठीतील कलावादी समीक्षा : डॉ. वि.दा. वासमकर, अक्षरदीप प्रकाशन - कोल्हापूर (२०१८)

आ.य.पवार लिखित 'ऊनपाऊस ' कवितेचे वाङ्.मयीन स्वरूप (समीक्षा) संपादक: डॉ. राजाराम सोनटक्के, डॉ. विजया राऊत भरारी प्रकाशन, मुंबई ५७ (२०२१)